सोबत-डॉ.सुभाष चव्हाण,जिल्हा शल्य चिकीत्सक,बुलढाणा यांचे निलंबन आदेश क्र.-विभाचौ-२०२४/प्रक्र१४/सेवा-४ब,सार्वजनिक आरोग्य विभाग,गो.ते.रुग्णालय संकुल इमारत,१० वा मजला, मंत्रालय,मुंबई-४०० ००१ दिनांक ०४ जुलै २०२४

.....................................................................................................................................

आरोग्य सेवा,

जा.क्र.विचौ/निलंबन आदेश/29121-25 /२४
कार्यालय, उपसंचालक, आरोग्य सेवा, अकोला
मंडळ, अकोला, दिनांक- 04/07/2024

प्रति,
डॉ.सुभाष चव्हाण,
जिल्हा शल्य चिकीत्सक,
सामान्य रुग्णालय,बुलढाणा.
(मार्फत-अतिरिक्त जिल्हा शल्य चिकीत्सक,सामान्य रुग्णालय,बुलढाणा)

(डॉ.कमलेश भंडारी)
उपसंचालक, आरोग्य सेवा,
अकोला मंडळ, अकोला

प्रतः- **अतिरिक्त जिल्हा शल्य चिकीत्सक,सामान्य रुग्णालय,बुलढाणा**

आपणास सुचीत करण्यात येते की, डॉ.सुभाष चव्हाण, शल्य चिकीत्सक,बुलढाणा यांचे निलंबन आदेश सोबत जोडलेली असुन ते डॉ.सुभाष चव्हाण यांच्या सद्याच्या पत्त्यावर पोहोचते करुन त्याबाबतची दिनांकीत पोचपावती तीन प्रतीमध्ये तात्काळ या कार्यालयास सादर करण्यात यावी.

प्रतः- मा.अवर सचिव,सार्वजनिक आरोग्य विभाग,सेवा-४ब, गो.ते.रुग्णालय संकुल इमारत,१० वा मजला,मंत्रालय,मुंबई-४०० ००१

प्रत — मा.आयुक्त तथा अभियान संचालक,आरोग्य सेवा,आयुक्तालय,मुंबई

प्रत — मा.सहसंचालक (अर्थ व प्रशासन) आरोग्य सेवा,आयुक्तालय,मुंबई

Scanned with CamScanner

# महाराष्ट्र शासन

गोपनिय

क्रमांक: विभाचौ-२०२४/प्र.क्र.१४/सेवा-४ब
सार्वजनिक आरोग्य विभाग,
गो. ते. रुग्णालय संकुल इमारत,
१० वा मजला, मंत्रालय, मुंबई-४०० ००१
दिनांक: ०४ जुलै, २०२४

## आदेश

संदर्भ - आयुक्त, तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचे पत्र
क्र. आसेआ/२क/टे.३/निलंबन/डॉ. सुभाष चव्हाण/जा.क्र. ४८२/२४, दिनांक २३/०२/२०२४

ज्याअर्थी, डॉ. सुभाष चव्हाण, जिल्हा शल्य चिकित्सक, बुलढाणा यांच्याविरुध्द बुलढाणा जिल्हातील सोमठाणा गावातील नागरीकांना धार्मिक कार्यक्रमामध्ये दि.२०.०२.२०२४ रोजी झालेल्या अन्न विषबाधा प्रकरणी डॉ. सुभाष चव्हाण, जिल्हा शल्य चिकित्सक, बुलढाणा यांनी आपत्कालीन परिस्थिती उद्भवली असतांना घटनास्थळी उपस्थित राहून रुग्णोपचाराबाबत आवश्यक उपाययोजना न करणे, वरिष्ठांना सदरहू घटनेची माहिती वेळीच न देणे इत्यादी कर्तव्यात कसूर केली आहे. तसेच त्यासंबंधी सुमोटो याचिकेचे सुनावणीस हजर राहण्याचे निर्देश असूनही गैरहजर राहले या गैरवर्तनाबाबत डॉ. सुभाष चव्हाण, जिल्हा शल्य चिकित्सक, बुलढाणा त्यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्याचे योजले आहे.

त्याअर्थी, आता मा. राज्यपाल, महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ मधील नियम ४ च्या व पोटनियम (१) (अ) अन्वये प्रदान केलेल्या शक्तीचा वापर करून, याद्वारे डॉ. सुभाष चव्हाण, जिल्हा शल्य चिकित्सक, बुलढाणा यांना या आदेशाच्या दिनांकापासून निलंबित करीत आहेत आणि ते पुढील आदेश काढले जाईपर्यंत निलंबित राहतील.

आणखी असाही आदेश देण्यात येत आहे की, हा आदेश अंमलात असेल तेवढ्या कालावधीत डॉ. सुभाष चव्हाण, जिल्हा शल्य चिकित्सक, बुलढाणा यांचे मुख्यालय, जिल्हा शल्य चिकित्सक अमरावती यांचे कार्यालय येथे राहील आणि उक्त डॉ. सुभाष चव्हाण, जिल्हा शल्य चिकित्सक, बुलढाणा यांना सक्षम अधिकाऱ्यांच्या पूर्व परवानगी शिवाय मुख्यालय सोडता येणार नाही.

हे निलंबन आदेश जोपर्यंत अमलात आहेत, तोपर्यंत महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ च्या नियम १६ मधील तरतुदीनुसार डॉ. सुभाष चव्हाण, जिल्हा शल्य चिकित्सक, बुलढाणा यांना खाजगी नोकरी स्विकारता येणार नाही, अथवा स्वतःला व्यापार अथवा उद्योगधंद्यामध्ये गुंतवून घेता येणार नाही. जर निलंबनाधीन असताना, उक्त डॉ. सुभाष चव्हाण, जिल्हा शल्य चिकित्सक, बुलढाणा यांनी खाजगी नोकरी स्विकारली अथवा कोणताही व्यापार किंवा उद्योगधंदा केल्यास, तर त्यांनी गैरवर्तन केल्याचे समजण्यात येऊन ते नियमानुसार कारवाईस पात्र राहतील, तसेच निर्वाह भत्ता मिळण्यास अपात्र ठरतील.



Scanned with CamScanner

उक्त डॉ. सुभाष चव्हाण, जिल्हा शल्य चिकित्सक, बुलढाणा यांना जोपर्यंत निलंबनाचे आदेश आहेत, तोपर्यंत महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वियेतर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदान) नियम, १९८१ च्या नियम ६८ मधील तरतुदीनुसार निर्वाह भत्ता आणि इतर पुरक भत्ते देण्यात यावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(अनिल वि. सावरे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

डॉ. सुभाष चव्हाण, जिल्हा शल्य चिकित्सक, बुलढाणा (आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांच्या कार्यालयामार्फत)

प्रत,

१. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बुलढाणा, जि बुलढाणा.
३. संचालक, आरोग्य सेवा, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई.
४. सह संचालक (अर्थ व प्रशासन), आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई.
५. उपसंचालक, आरोग्य सेवा, अकोला मंडळ, अकोला.
६. जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा रुग्णालय, बुलढाणा.
७. जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा रुग्णालय, अमरावती.
८. जिल्हा कोषागार अधिकारी, बुलढाणा/अमरावती.
९. मा.मंत्री (सा.आ.व कु.क.)यांचे खाजगी सचिव मंत्रालय, मुंबई
१०. अवर सचिव (सेवा २), सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. निवड नस्ती (सेवा ४ ब).

Scanned with CamScanner